आरोग्य सेवांवर लोकाधारित देखरेख व नियोजन प्रकल्प आरोग्य सेवा यादी प्राथमिक आरोग्य केंद्र ग्रामीण रुग्णालय/उप जिल्हा रुग्णालयांच्या दर्शनी भागात लावण्याबाबत........

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्र. राग्राअ २०११/प्र.क्र २७३/आरोग्य-७ अ
मंत्रालय,मुंबई ४०००३२.
दिनांक :-१४/०२/२०१२

**प्रस्तावना :-**

राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत आरोग्य सेवांवर लोकाधारित देखरेख व नियंत्रण प्रकल्प राबविला जात आहे. या प्रकल्पांतर्गत राज्य सुकाणू समितीच्या बैठकीत राज्यातील आरोग्य संस्थामार्फत देणात येणा-या आरोग्य सेवांची यादी प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालय/उप जिल्हा रुग्णालयांच्या दर्शनी भागात लावण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-** राज्यातील आरोग्य संस्थांमार्फत देण्यात येणा-या आरोग्य सेवांची यादी प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालय/उप जिल्हा रुणालयांच्या दर्शनी भागात लावण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.:-

## प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी आरोग्य सेवांची यादी

**१. बाह्य रुग्ण सेवा :-**

- प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये सकाळी ४ तास व दुपारी/संध्याकाळी २ तास बाह्य रुग्ण सेवा उपलब्ध असेल.

**२.आंतररुग्णसेवा :-**

- आंतर रुग्णांसाठी प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्रात ६ खाटा उपलब्ध असतील.
- प्राथमिक आरोग्य केंद्रात सर्व रुग्णांसाठी २४ तास अत्यावश्यक आरोग्य सेवा उपलब्ध असतील.
- दुखापत झालेल्या, अपघात झालेल्या रुग्णाला आवश्यक प्राथमिक उपचार दिले जातील.
- या सेवेमध्ये कुत्रा, साप चावलेल्या रुग्णांना द्यावयाच्या व इतर अत्यावश्यक आरोग्य सेवांचा समावेश आहे.
- प्राथमिक आरोग्य केंद्रात ज्या अत्यावश्यक आरोग्य सेवा देणे शक्य नाही अशा आरोग्य सेवांसाठी सर्व रुग्णांना येथून संदर्भसेवा दिली जाईल.

**३. माता व बाल आरोग्य संदर्भातील सेवा व कुटूंब नियोजन :-**

- **गरोदरपणातील सेवा :-**

  कोणत्याही गरोदर स्त्रीला प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये खालील आरोग्य सेवा मिळतील. तिला कोणतीही आरोग्य सेवा नाकारली जाणार नाही.

  ➢ **प्रसूति दरम्यानची काळजी व सेवा (२४ तास स्वाभाविक व असिस्टेड प्रसूतीसेवा)**

- एखादी स्त्री प्रसूतीसाठी प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये आल्यावर तिची प्रसूती (नॉर्मल डिलीव्हरी) करण्यात येईल.
- विशेष तज्ञांची गरज असलेल्या प्रत्येक गर्भवती महिलेला तत्पर व योग्य संदर्भ सेवा दिली जाईल.
- गरोदरपणामुळे सुरु झालेल्या उच्च रक्तदाबाचे नियंत्रण करणे तसेच त्या गरोदर स्त्रीला आवश्यकता असल्यास योग्य ती संदर्भ सेवा देण्यात येईल.

- ज्या गर्भवती स्त्रीला विशेषज्ञाकडे पाठवायचे आहे, अशा स्त्रियांना संदर्भ सेवेपूर्वी दयावयाचे उपचार येथे दिले जातील.

➢ **बाळंतपणानंतर सेवा :-**

- बाळंतपणानंतर उपकेंद्राच्या कर्मचाऱ्यांमार्फत कमीत कमी २ गृहभेटी दिल्या जातील. पहिली भेट बाळंतपणानंतर ४८ तासांच्या आत व दुसरी भेट ७ दिवसांच्या आत दिली जाईल.
- बाळंतपणानंतर अर्ध्या तासाच्या आत बाळाला आईचे दूध सुरु करायला प्रवृत्त केले जाईल.
- बाळंत झालेल्या स्त्रीने कोणत्या प्रकारचा आहार घ्यावा, स्वच्छतेची काय काळजी घ्यावी, नवजात बाळाची कशा प्रकारे काळजी घ्यावी. तसेच बाळंतपणानंतर गर्भनिरोधकांविषयीची माहिती देणे इ. सेवा देण्यात येतील.
- वरील सेवांखेरीज प्राथमिक आरोग्य केंद्र, जननी सुरक्षा योजनेचा लाभ पुरविला जाईल. (ज्या गरोदर मातेचे बाळंतपण शासकीय आरोग्य संस्थेत झालेले आहे त्यांना शहरी भागासाठी रु.६००/- व ग्रामीण भागासाठी रु. ७००/- रोख दिले जातील. ज्या मातेची प्रसुती घरी झालेली आहे तीला बाळंतपणानंतर ७ दिवसात रु. ५००/- देण्यात येईल.)

➢ **नवजात बाळांची प्राथमिक काळजी :-**

- प्रत्येक नवजात आजारी बाळांची तातडीची काळजी प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये घेण्यात येईल.
- लहान बाळांना होणाऱ्या नेहमीच्या आजारांवर उपचार दिले जातील.
- नवजात बाळाचे तापमान कमी होणे इत्यादी आजारांच्या व्यवस्थापन करण्याबाबत आरोग्य सेवा दिल्या जातील.
- बाळ जन्माला आल्यावर ६ महिने फक्त आईचे दूध द्यावे, यासाठी तिला प्रवृत्त करण्यात येईल.
- सर्व अर्भकांचे व बालकांचे संपूर्ण लसीकरण व लहान मुलांना व्हिटॅमिन "ए" चा डोस देण्यात येतील.
- बालकांमधील कुपोषण, जंतूसंसर्ग यांसारखे आजार प्रतिबंध व नियंत्रण करणे इत्यादी सेवा दिल्या जातील.

➢ **कुटूंब नियोजन**

- निरोध, गर्भनिरोधक गोळया, तातडीचे गर्भनिरोधक व तांबी बसवणे इ. ची नियमित उपलब्धता असेल.
- पुरुष नसबंदी व स्त्री नसबंदी शस्त्रक्रियेची सुविधा उपलब्ध असेल.
- कुटूंब नियोजनासाठी शस्त्रक्रियेसारखी कायम स्वरुपी नसबंदी पध्दत अवलंबिलेल्या जोडप्यांबरोबर नियमित पाठपुरावा ( पुरुष नसबंदी, स्त्री नसबंदी ) करण्यात येईल.
- सुरक्षित गर्भपाताच्या सेवेची ज्यांना गरज आहे अशा लोकांसाठी समुपदेशन, सल्ला तसेच संदर्भसेवा देण्यात येईल.
- ज्या जोडप्यांना मूल-बाळ होत नाही, अशा जोडप्यांना समुपदेशन तसेच संदर्भसेवा देण्यात येईल.

➢ **प्रजनन संस्थेचे आजार / लिंग सांसर्गिक आजारांचे व्यवस्थापन**

- ग्रामीण रुग्णालयात प्रजनन संस्थेचे आजार तसेच लिंग सांसर्गिक आजार यांच्या प्रतिबंधासंदर्भातील आरोग्य शिक्षण, तसेच योग्य उपचारही दिले जातील.

➢ **पुरक पोषण आहार संदर्भ सेवा (समन्वय - एकात्मिक बाल विकास सेवा योजना (आय.सी.डी.एस.))**

- कुपोषित मुली-मुलांच्या कुटुंबियांना, गर्भवती स्त्रिया, मुली व इतर व्यक्तींना कुपोषण संदर्भातील निदान तसेच पोषण विषयक सल्ला दिला जाईल व त्याचा योग्य तो पाठपुरावा करण्यात येईल.
- रक्त पांढरी तसेच व्हिटॅमिन "ए" च्या कमतरतेचे निदान तसेच व्यवस्थापन योग्य रितीने करण्यात येईल.

- पोषण विषयक मुद्यांबाबत एकात्मिक बाल विकास सेवा योजना (आय.सी.डी.एस.) विभागाबरोबर नियमित समन्वय साधण्यात येईल.

४. **शालेय व किशोर वयीन आरोग्य :-**

- प्रत्येक शालेय विद्यार्थ्यांची नियमित आरोग्य तपासणी तसेच उपचार, जंतावर उपचार, संदर्भसेवा तसेच पाठपुरावा करण्यात येईल. या विद्यार्थ्यांना आरोग्यसंदर्भातील सेवा मिळतील.
- प्राथमिक आरोग्य केंद्रात किशोरवयीन मुलां-मुलींना जीवन शैली विषयक शिक्षण, समुपदेशन तसेच योग्य ते उपचार दिले जातील.
- किशोरवयीन मुलींची रक्त तपासणी केली जाईल तसेच त्यांना लोहाच्या गोळया दिल्या जातील, महिलांसोबत एकत्रितपणे पोषण शिक्षण दिले जाईल. तसेच शुध्द पिण्याचे पाणी, प्राथमिक स्वरुपातील सांडपाण्याची व्यवस्था याचा प्रचार-प्रसार करणे. त्या त्या भागात कायमस्वरुपी आढळणारे आजारांबाबत प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे व नियंत्रण करणे इ. सेवा दिल्या जातील.

५. **रोगसर्वेक्षण तसेच साथीच्या आजारांवर नियंत्रण :-**

- पाण्याच्या गुणवत्तेची तपासणी करण्यात येईल.
- परिसर स्वच्छता व वैयक्तीक स्वच्छतेबाबत आरोग्य शिक्षण देण्यात येईल.
- सेप्टीक शौचालयाचा वापर करणे, कचऱ्याची योग्य रितीने विल्हेवाट लावणे, लोक स्वच्छतेसाठी प्रवृत्त होतील यासाठी जनजागृती करण्यात येईल.
- जीवन विषयक आकडेवारीचे उदा.जन्म-मृत्यू, माता मृत्यू, बालमृत्यू नोंदणी इ. चे संकलन व अहवाल सादरीकरण करण्यात येईल.

६. **माता बाल संगोपन कार्यक्रम, राष्ट्रीय एड्स नियंत्रण, राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रम राबवणे :-**

**सुधारित राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम (आर.एन.टी.सी.पी.)**

- सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रे ही सुधारित राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमाच्या मार्गदर्शक तत्वानुसार डॉट्स सेंटर म्हणून सेवा देतील.

**एकात्मिक रोग सर्वेक्षण कार्यक्रम (आय.डी.एस.पी)**

- प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपकेंद्रांकडून माहिती गोळा करतील व त्याचे डाटा पडताळणी करुन अहवाल जिल्हा सर्वेक्षण पथकाला सादर करतील.
- प्रयोग शाळेत पुढील चाचण्या केल्या जातील, उदा. हिवताप चाचणी, क्षयरोग तपासणी, टायफॉईड्, तसेच दूषित पाण्याची चाचणी इत्यादी.

**राष्ट्रीय अंधत्व नियंत्रण कार्यक्रम (एन.पी.सी.बी)**

- या कार्यक्रमांतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये डोळे तपासणे, डोळयाच्या आजाराचे निदान व उपचार इत्यादी सेवा दिल्या जातील.
- मोतीबिंदूचे निदान व ऑपरेशनसाठी संदर्भसेवा इत्यादी सेवा दिल्या जातील.

**राष्ट्रीय किटकजन्य आजार नियंत्रण कार्यक्रम (एन.व्ही.बी.डी.सी.पी.)**

- प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये राष्ट्रीय किटकजन्य आजार नियंत्रण कार्यक्रम अंतर्गत मलेरियाचे निदान, सुक्ष्मदर्शकाखाली केलेले पक्के निदान व मलेरियावर उपचार इ. सेवा दिल्या जातील.

**राष्ट्रीय एड्स नियंत्रण कार्यक्रम (एन.ए.सी.पी.)**

- लिंग सांसर्गिक आजार व एच.आय.व्ही./एड्स सारखे आजार होऊ नयेत म्हणून या आजारांच्या बाबतीत लोकांमध्ये जनजागृती करणे, मातेकडून लहान बाळाला लागण होणाऱ्या एच.आय.व्ही. ला (PPTCT) प्रतिबंध करण्याबाबत जनजागृती करणे.
- एच.आय.व्ही. ची लागण झाल्याबाबत निश्चित निदान करण्यासाठी जवळच्या जिल्हा रुग्णालयात व्ही सी.टी.सी. केंद्राशी संपर्क साधणे, संदर्भसेवा देणे.

**नेहमीच्या व तात्काळ सुविधा (संदर्भसेवा) :-**

प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर विशेषज्ञांची गरज असलेल्या रुग्णांना संदर्भसेवा पुरवण्यात येईल. या सुविधांमध्ये -

- रुग्णाची प्रकृती स्थिर राहण्यासाठी उपचार देण्यात येतील.
- संदर्भसेवेसाठीच्या प्रवासदरम्यान वैद्यकीय सुविधा पुरवून आधार देण्यात येईल.
- संदर्भसेवेसाठी वाहनाची व्यवस्था करण्यात येईल. ( ॲम्बुलन्स/खासगी वाहन )

**मुलभूत प्रयोगशालेय सेवा :-**

- प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये लघवी, शौच व रक्ताच्या तपासण्या केल्या जातील.
- क्षयरोगासाठी बेडका तपासणी करण्यात येईल.
- हिवतापाच्या जंतूसाठी रक्त नमुना तपासणी करण्यात येईल.

**जीवनविषयक घटनांच्या नोंदी व अहवाल :-**

- जन्म, मृत्यू, मातामृत्यू, अर्भकमृत्यू इ. नोंद ठेवून अहवाल सर्व संबंधितास पाठविण्यात येतील.
- प्राथमिक आरोग्य केंद्रामार्फत पुरविल्या जाणाऱ्या सेवांबाबतचे सर्व अहवाल अद्ययावत ठेवण्यात येतील.

**ग्रामीण रुग्णालय/उपजिल्हा रुग्णालय**

प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये दिल्या जाणाऱ्या सर्व सेवा ग्रामीण रुग्णालयात देखील दिल्या जातील. नेहमीच्या व तातडीच्या शल्यचिकित्सेमधील काळजी घेणे. यामध्ये खालील गोष्टीचा समावेश केलेला आहे.

- एखाद्या व्यक्तीला पुढील प्रकारच्या शल्यचिकित्सेसंदर्भातील सेवा निश्चित मिळतील ब्लेडच्या सहाय्याने काप घेऊन पू, दुषित स्त्राव बाहेर काढणे (Incision and drainage), हर्नियासाठीची शस्त्रक्रिया, अंडवृध्दी व ॲपेंडीक्स, मुळव्याध, फिस्टयुला यांसाठीच्या शस्त्रक्रियांची सेवा देणे.
- तसेच रक्तस्त्राव, आतडयांमधील अडथळा यासारख्या परिस्थितीत ग्रामीण रुग्णालयात सेवा पुरविली जाईल.
- मेडिसिन विभागाच्या नेहमीच्या व तातडीच्या केसेसची काळजी घेण्यात येईल.
- राष्ट्रीय कार्यक्रमासंबंधीच्या सर्व तात्काळ केसेस मार्गदर्शक सुचनांनुसार हाताळल्या जातील. जसे डेंग्यू, रक्तस्त्रावाचा ताप, मेंदूचा हिवताप, स्वाइन फ्ल्यू इ.
- ग्रामीण रुग्णालयात येणाऱ्या प्रत्येक गर्भवती स्त्रीला २४ तास सर्व साधारण नैसर्गिक व बाहय मदतीची गरज असलेल्या प्रसुतीसाठी लागणाऱ्या सर्व सेवा मिळतील. त्या स्त्रीला कोणत्याही प्रकारची आरोग्य सेवा नाकारली जाणार नाही.
- आवश्यक व तातडीच्या प्रसूती सेवेतील काळजी येथे घेतली जाईल. उदा. सिझेरियन डिलीव्हरी व त्या संदर्भातील इतर उपचार.
- लेप्रोस्कोपी (बिनटाक्याची स्त्री नसबंदी) शस्त्रक्रियेसह इतर सर्व प्रकारच्या कुटूंबकल्याणाच्या सेवा देण्यात येतील.
- सुरक्षित गर्भपातासंबंधीच्या सेवा ग्रामीण रुग्णालयात दिल्या जातील. (एम.टी.पी. कायद्यानुसार त्या स्त्री व्यतिरिक्त कोणाच्याही सहीचा आग्रह धरला जाणार नाही.)
- नवजात बालकांची काळजी योग्य रितीने घेण्यात येईल. प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये दिल्या जाणाऱ्या सर्व सेवा येथे दिल्या जातील व सोबतच तज्ञसेवा देखील दिल्या जातील.

* आजारी बाळांची नेहमीची व इमर्जन्सीमध्ये अथवा तातडीच्या वेळी घ्यायच्या काळजीसंदर्भातील सर्व आरोग्य सेवा येथे दिल्या जातील (तात्काळ स्वरुपाची काळजी)
* इतर उपचारांमध्ये, नाकातील रक्तस्त्राव थांबविणे, बाह्यवस्तू श्वास नलिकेत गेल्यास त्या काढणे, ट्रॅकीऑस्टॉमी इ. समावेश आहे.
* सर्व राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांच्या सेवा ग्रामीण रुग्णालयांमार्फत पुरविण्यात येतील. (अंधत्व नियंत्रण कार्यक्रम, एकात्मिक साथरोग सर्वेक्षण हे एकत्रित स्वरुपात दिल्यास जीवनदायी ठरु शकतात.)

**१. सुधारित राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम:-**

ग्रामीण रुग्णालयातील मायक्रोस्कोपी सेंटरमधून (प्रयोगशाळेमधून) रोग निदानात्मक सेवा (वेगवेगळया रोगांचे निदान करण्यासाठी आवश्यक असलेल्या चाचण्या) दिल्या जातील. क्षयरोग नियंत्रणासंदर्भातील मार्गदर्शक सुचनांनुसार उपचाराच्या सर्व सेवा क्षयरोग झालेल्या रुग्णांना दिल्या जातील, कोणत्याही स्वरुपाचा भेदभाव येथे केला जाणार नाही.

**२. राष्ट्रीय एड्स नियत्रंण कार्यक्रम**

ग्रामीण रुग्णालय हे स्वेच्छा समुपदेशन व उपचार केंद्र असेल, त्यातील मातेकडून बाळाला संसर्ग होणाऱ्या आजाराचे प्रतिबंधन कार्यक्रम म्हणजेच एकात्मिक समुपदेशन व उपचार केंद्रातील दिल्या जाणाऱ्या सेवा होय. ग्रामीण रुग्णालय व २४ x ७ प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये प्रजनन संस्थेचे आजार / लैंगिक आजारांच्या व्यवस्थापना संदर्भातील सेवांचा विस्तार करण्यात येईल. ग्रामीण रुग्णालयात प्रजनन संस्थेचे आजार तसेच लैंगिक आजारांसाठीची प्राथमिक स्क्रिनिंग टेस्ट ही सेवा देण्यात येईल. तसेच मातेकडून बाळाला एच.आय.व्ही. लागणीचे प्रतिबंधन करण्यासंदर्भातील सेवा दिल्या जातील.

**३. राष्ट्रीय किटकजन्य आजार नियत्रंण कार्यक्रम**

ग्रामीण रुग्णालयात नेहमीच्या (साधारण) व गुतांगुंतीच्या हिवतापाच्या तसेच हत्तीरोग, डेंग्यू, जपानी मेंदूदाह, काळा आजार या रोगाचे निदान करण्यासाठीच्या सेवा तसेच उपचारात्मक सुविधा दिल्या जातील. विशेषत: हे आजार ज्या भागात आढळतात त्या भागातील लोकांना या आजारासाठी निदानात्मक व उपचारात्मक सेवा देण्यात येतील.

**४. राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रम**

कुष्ठरोग झालेल्या रुग्णाचे रोगनिदान व रुग्णास उपचार, कुष्ठरोगामधील रिॲक्शनसंदर्भातील (लेप्रो रिॲक्शचनचे) उपचार, व्यवस्थापन तसेच कुष्ठरोग झालेल्या रुग्णांमध्ये व्यंग टाळण्यासाठी सल्ला देणे या सेवा ग्रामीण रुग्णालयात मिळतील.

**५. राष्ट्रीय अंधत्व नियंत्रण कार्यक्रम**

सर्वसाधारण डोळयांचे आजार, दृष्टीदोषांचे आजार यांचे निदान व उपचारात्मक सेवा, डोळे तपासणे तसेच शस्त्रक्रियेची सेवा, मोतीबिंदूसाठीचे ऑपरेशन, काही निवडक ठिकाणी लेन्स बसविण्याचे ऑपरेशन या सुविधा दिल्या जातील.

**६. एकात्मिक साथरोग सर्वेक्षण प्रकल्प**

या कार्यक्रमांतर्गत ग्रामीण रुग्णालयात हिवताप, क्षयरोग, विषमज्वर या आजारांचे निदान, पाण्यात जर विष्ठा मिसळली गेली असेल तर त्यासाठी चाचणी आणि पाण्यातील क्लोरिनचे प्रमाण तपासणीची चाचणी इ. सेवा देण्यात येतील. ग्रामीण रुग्णालय हे क्षेत्रीय सर्वेक्षण पथक म्हणून कार्यरत राहील. सर्वेक्षणासंदर्भातील माहिती एकत्र करुन त्याचे विवेचन करुन अहवाल जिल्हा सर्वेक्षण पथकाला पाठवेल. साथ उद्रेकाच्या परिस्थितीत ग्रामीण रुग्णालय योग्य ती कार्यवाही सुरु करतील.

इतर सेवा

- रक्तसाठवण्याची यंत्रणा व सुविधा ग्रामीण रुग्णालयात उपलब्ध करण्यात येईल.
- आवश्यक प्रयोगशालेय सेवा सुविधाही ग्रामीण रुग्णालय स्तरावर मिळतील.
- तसेच आवश्यक ती संदर्भसेवाही देण्यात येईल. (वाहनव्यवस्थेसह)

उपरोक्त सेवा देण्यासाठी जबाबदार अधिकारी व संनियंत्रण अधिकारी पुढीलप्रमाणे:-

| अ.क्र | स्तर | जबाबदार अधिकारी | संनियंत्रण अधिकारी |
|---|---|---|---|
| १ | प्राथमिक आरोग्य केंद्र | वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र, तालुका वैद्यकीय अधिकारी, पंचायत समिती | जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद |
| २ | ग्रामीण/उपजिल्हा रुग्णालय | वैद्यकीय अधिक्षक, ग्रामीण/उपजिल्हा रुग्णालय | जिल्हा शल्यचिकित्सक, सामान्य रुग्णालय |

प्राथमिक आरोग्य केंद्रात आरोग्य सेवा न मिळाल्यास मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्याकडे तशी तक्रार दाखल करता येईल. त्याच बरोबर ग्रामीण/ उपजिल्हा रुग्णालयात आरोग्य सेवा न मिळाल्यास उपसंचालक, आरोग्य सेवा, परिमंडळ किंवा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्याकडे तक्रार दाखल करता येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( रा.शं.जाधव )
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

सर्व जिल्हाधिकारी
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
सर्व उपायुक्त (विकास) सहाय्यक आयुक्त (विकास),
विभागीय आयुक्त कार्यालय
सर्व उपायुक्त(अस्था), विभागीय आयुक्त कार्यालय
सर्व उपसंचालक, आरोग्य सेवा मंडळ
उपसंचालक (आरसीएच) कुटूंब कल्याण भवन,पुणे
सर्व जिल्हा शल्यचिकित्सक,
सर्व उपमुख्य कार्यकारी अधिकारी(बा.क.), जिल्हा परिषद
सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद
सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी प्रकल्प
सर्व अधिक्षक ग्रामीण रुग्णालय
सर्व गट विकास अधिकारी, पंचायत समिती
सर्व तालुका आरोग्य अधिकारी
सर्व बाल विकास प्रकल्प अधिकारी, एबाविसेयो
प्रतिलिपी:-मा. अपर मुख्य सचिव (आरोग्य) यांचे स्वीय सहायक, सा.आ.विभाग, मंत्रालय, मुंबई
सचिव ( २) सार्वजनिक आरोग्य विभाग,मंत्रालय,मुंबई यांचे स्वीय सहाय्यक

--------------